# अभिनेत्री ममता कुलकर्णी आरोपी क्र.१४

**ठाणे :** सोलापूरच्या एव्हॉन लाईफसायन्सेस लि. या कंपनीतून देश विदेशात झालेल्या इफे ड्रीन तस्करीप्रकरणात एकेकाळची प्रसिद्ध अभिनेत्री ममता कुलकर्णीची ठाणे पोलिसांनी आरोपी क्रमांक १४ अशी नोंद केली आहे. केनियात झालेल्या इफे ड्रीनच्या तस्करीत तिने चांगली भूमिका बजावल्यामुळे तिला एव्हॉनचे संचालक किंवा व्यवस्थापकपदही बहाल केले जाणार होते, अशी माहिती या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींकडून पोलिसांना मिळाली.

ठाण्याच्या डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहाजवळ दोन महिन्यांपूर्वी सागर पोवळे आणि मयूर सुखदरे या दोघांना इफे ड्रीनच्या तस्करी प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडील माहितीतूनच एव्हॉनचा संचालक मनोज जैन, व्यवस्थापक पुनित श्रींगी, नरेंद्र कांचा आदी दहा जणांना पोलिसांनी वेगवेगळ्या भागातून अटक केली. तर एव्हॉनमधून अडीच हजार कोटींचा सुमारे २३ टन इफे ड्रीन आणि सुडोइफे ड्रीनचा साठाही पोलिसांनी हस्तगत केला. याच प्रकरणात आंतरराष्ट्रीय ड्रग माफीया विकी गोस्वामी आणि त्याची कथित पत्नी अभिनेत्री कुलकर्णी यांचीही नावे तपासात उघड झाली. यात सध्या ममता, विकी, सुशिल सुब्रमण्यम आणि तांजानियातील रहिवाशी डॉ. अब्दुल्ला हे चौघे पसार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

एव्हॉनमधील इफे ड्रीनची केनियासह इतर देशांमध्येही तस्करी करण्यासाठी ममता, मनोज जैन, जयमुखी किशोर राठोड आणि विकी गोस्वामी यांच्यात वारंवार केनियामध्ये बैठका झाल्या. या बैठकांचे सबळ पुरावेही पोलिसांच्या हाती लागले आहेत. ममताच्या ओशिवारा येथील दोन्ही सदनिकांच्या मेन्टनन्सचे पैसेही विकीकडून दिले जात होते. ८ जानेवारी २०१६ मध्ये केनियात झालेल्या बैठकीतही ममता होती. इफे ड्रीनच्या तस्करीपोटी हवालाद्वारे ममता, विकी, जयमुखी आणि जैन यांना करोडो रुपये मिळाल्याचे सबळ पुरावेही हाती लागल्याची माहिती पोलिसांनी दिली. १ममता आणि तिचा कथित पती विकी हे केनियात असण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. केनिया आणि भारत यांच्यात आरोपी प्रत्यार्पणाचा करार नाही. मात्र, रेड कॉर्नर नोटीस बजावल्यानंतर त्यांना कोणत्याही देशातून इतरत्र पळ काढता येणार नाही.

दोन कोणत्याही देशाच्या विमानतळावर ते आले तर इंटरपोलमार्फत त्यांची माहिती ठाणे आणि अमेरिकेच्या पोलिसांना मिळू शकणार आहे. त्यादृष्टीने आता ही रेड कॉर्नर नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरु केल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त बी. के. शेळके यांनी लोकमतफला दिली.

## पूर्ववैमनस्यातून भांड्याच्या दुकानदाराला मारहाण

**पिंपरी :** पूर्ववैमनस्यातून दुकानात घुसून दुकानमालकाला दुचाकीवरुन निर्जनस्थळी नेवून चार जणांच्या टोळक्याने मारहाण केली. ही घटना गुरुवारी (दि.१६) रात्री साडे आठच्या सुमारास चिखलीतील मोरेवस्ती येथे घडली.

बंड्या उर्फ पुरुषोत्तम राजेंद्र वीर याच्यासह त्याच्या तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अजय जैन (वय २६, रा. निगडी) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजय याचे चिखली मोरेवस्ती येथे नाकोडा मेटल्स नावाने भांड्याचे दुकान आहे. अजय आणि बंड्याची भांडणे आहेत. त्यातून त्यांच्यात वैमनस्य आहे. गुरुवारी रात्री साडे आठच्या सुमारास अजय हा आपल्या भांड्याच्या दुकानात होते. त्यावेळी बंड्या आपल्या तीन साथीदारांना घेवून दुकानात आला. अजय आणि त्यांच्या दुकानातील कामगार रोहित याला मारहाण करत दुकानाबाहेर ओढले. बळजबरीने दोघांना दुचाकीवर बसवून कुदळवाडी येथील निर्जन स्थळी नेले. अजय आणि रोहितला दगडाने मारुन गंभीर जखमी केले. तसेच अजय याच्या खिशातील ५ हजार ९७२ रुपयांची रोकड आणि एक मोबाईल फोन घेवून पोबारा केला. सहायक पोलीस निरीक्षक एस. एन. पवार तपास करत आहेत.

## योगाभ्यासी कैद्यांना मिळणार शिक्षेत सूट

**नागपूर :** येथील मध्यवर्ती कारागृहात बंदीस्त असलेल्या कैद्यांपैकी १३६ कैद्यांना त्यांच्या शिक्षेतून ३ महिन्यांची सूट मिळणार आहे. या कैद्यांनी योगाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल त्यांना शिक्षेतून सुटीचा बोनस मिळणार आहे.

आंतराष्टीय योग दिनाचे औचित्य साधून वर्षभरापूर्वी मध्यवर्ती कारागृहात एक योजना जाहिर करण्यात आली होती. त्यानुसार, जे बंदीवान योगाभ्यास करून परिक्षा पास करतील, अशांना त्यांना झालेल्या एकूण शिक्षेपैकी ३ महिन्यांची शिक्षा कमी करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. येथील कारागृहात ३५० बंदीवान नियमित योगाभ्यास करतात. त्यातील १३६ जणांनी योगाची परिक्षा पास केली आहे. पतंजली योग पीठा तर्फे ही परिक्षा घेण्यात आली होती. त्यात उत्तीर्ण झालेल्या १३६ बंदीवानाची शिक्षा कमी करण्याचा निर्णय कारागृह प्रशासनाने घेतला. शिक्षा माफीचा (३ महिन्यांच्या) कागदोपत्री अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला असून, त्यावर लवकरच निर्णय अपेक्षीत असल्याचे कारागृह अधीक्षक योगेश देसाई यांनी आज पत्रकारांना सांगितले.

मंगळवारी सकाळी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कारागृहात एका कार्यक्रमाचे आयोजन बंदीवानांनी योगाची प्रात्यक्षीके सादर केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना देसाई यांनी उपरोक्त माहिती दिली. नेहमी दडपणात असलेल्या बंदीवानांना योगाभ्यासामुळे तणावमुक्त जीवन जगण्यास मदत होऊ शकते,असा निष्कर्ष एका पाहणीतून पुढे आल्याचे ते म्हणाले. अनेक योगाभ्यासी बंदीवानांनी स्वत:चे अनुभव कथन करताना देसाई यांच्या या कथनाला दुजोरा दिला.

## सातारकरांनी गिरविले योगसाधनेचे धडे

**सातारा :** लोकमतफआणि आर्ट ऑफ लिव्हिंगफ यांच्या सुंयक्त विद्यमाने योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर दि. १७ जूनपासून पाच दिवसांचे योग शिबिर आयोजित केले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मंगळवारी जागतिक योग दिनी शिबिराचा समारोप करण्यात आला. या पाच दिवसांत नागरिकांनी योगसाधनेचे धडे गिरविले.

मंगळावारी पोवई नाका येथील राजसी शॉप व्हेन्यू येथे योग दिनानिमित्त शहरातील नागरिकांनी योगसाधनेला मोठी उपस्थिती लावली होती. आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक अभय चव्हाण, सुहास फरांदे, योग शिक्षिका सरिता फडतरे यांनी शिबिरार्थींना प्रशिक्षण दिले. योगाभ्यास ही भारतीयांची प्राचीन परंपरा आहे. त्याचे अनुकरण जगभरातील लोक करत आहेत.

निरोगी जीवन अन् मन:स्वास्थ्यासाठी ध्यान, प्राणायाम, योगासने या शिबिरात शिकविण्यात आली. शिबिरात अकरा वर्षांच्या मुलांपासून ते सत्तर वर्षांच्या आजीआजोबांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिक यामध्ये सहभागी झाले होते. सातारा शहरातील सखी मंच सदस्य व त्यांच्या परिवारातील सदस्यांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आर्ट ऑफ लिव्हिंगमार्फत सातारा जिल्ह्यात जागतिक योग दिवसाचे औचित्य साधून एकाचवेळी तीनशे ठिकाणी योग शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

**आबालवृद्धांचा सहभाग**

गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या योग शिबिरात शहरातील आबालवृद्धांनी सहभागी होऊन योगसाधना केली. प्राणायाम, योगासनांचे धडे घेतले.

पान १ वरुन



## पुणे मेट्रोला मिळणार गती?

कार्यक्रमासाठी पुण्यात येत असल्याने घोषणा करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यावेळी महापालिका आयुक्त कुणाल कुमार म्हणाले की, पुणे मेट्रोची प्री पायबीची बैठक २३ जून रोजी दुपारी ३ वाजता दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे. तसेच या बैठकीच्या मंजुरी नंतर पीआयबी आणि केंद्रीय मंत्रीमंडळाची बैठक होणार आहे. या सर्व प्रक्रियेनंतर मेट्रोचा प्रश्न मार्गी लागणार आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी महापौर प्रशांत जगताप म्हणाले की, मागील कित्येक महिन्यापासून पुणे मेट्रोचा प्रश्न मार्गी लागवा.यासाठी पाठ पुरावा करण्यात येत होता. मात्र २३ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्री पीयबी बैठकीत मंजुरी मिळेल. तसेच या पुढील १५ दिवसात मेट्रोला गती मिळण्यास मदत होणार आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## चित्रफितीतून स्वच्छ लोणावळा सुंदर लोणावळ्याचा संदेश

महिन्यांपूर्वी रेल्वेकडे परवानगीसाठी पत्र व्यवहार केला होता. त्याला देखील अल्पावधीत प्रतिसाद मिळाल्याने भिंती रंगविण्याचे काम सुरु करण्यात आले.

हे करत असताना आम्ही लोणावळा व इतर भागातील नागरिकांना यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते. लोणावळा येथील रोट्रक्ट तसेच लोणावळा पुणे, मुंबई भागातील विदयार्थी ज्यांना चित्र काढण्याची आवड आहे, जे चित्रकार आहेत अशा अनेकांनी या उपक्रमात सहभाग घेत वेगवेगळे संदेश देणारे चित्र रेखाटण्याची चळवळ सुरु झाली आहे.

मुलांना रंग साहित्य रोटरी पुरविते. लोणावळा रेल्वे स्थानकावर ४ बाय ८ आकाराच्या २५ भिंती आहेत. यापैकी १५ भिंती रंगविण्यात आले असून उर्वरित कामे सुरु आहेत. लोणावळयातील जास्तीत जास्त नागरिक व चित्र कलावंतानी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या कल्पकतेमधून समाजाला चांगला संदेश द्यावा, असे आवाहन नितिन कल्याण यांनी केले आहे.

ज्या ठिकाणी हया भिंती रंगविण्यात आल्या आहेत, तेथे चांगले परिणाम दिसून येऊ लागले आहेत. नागरिक स्वत:हून स्थानकावर रेखाटलेल्या या चित्रफितीचे अनुकरण करत जागृत होत आहेत. आतापर्यत रंगविलेल्या चित्रांमध्ये पाणी वाचवा, स्वच्छ भारत स्वच्छ लोणावळा, झाडे वाचवा, कचरा टाकण्यासाठी कचराकुंडीचा वापर करा, ओला व सुका कचरा वर्गीकरण करा, महिलांना स्वातंत्र्य दया, निर्सगचित्र आदींचा समावेश आहे.

यानंतरच्या टप्प्यामध्ये रेल्वे टिकिट घरांच्या बाजुला असलेला पत्रा यावर विविध चित्र काढण्यात येणार आहेत. त्यांची साईज अंदाजे २० बाय ४० आहे. लोणावळयातील सर्व कलावंताने या कामात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शहरात येणा–या पर्यटकांना चांगला संदेश देण्यासाठी एक पाऊल पुढे यावे, असे आवाहन रोटरी क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुण्यातील विद्यार्थ्यांच्या ‘स्वयम्’सह २० उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण

या सर्व उपग्रहांचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण झाल्यानंतर श्रीहरिकोटा येथे शास्त्रज्ञांनी आनंदोत्सव साजरा केला. इतिहासात पहिल्यांदाच २० उपग्रहांचं अवकाशात एकत्र प्रक्षेपण केले गेले. पृथ्वीच्या निरीक्षणासाठी कार्टोसॅट २’ आणि पुण्यातील सीओईपीच्या विद्यार्थ्यांच्या ‘स्वयम’ या उपग्रहासोबत १८ उपग्रहाचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले.

## चिंचवड येथील पेट्रोल पंपावर झालेल्या तरुणाच्या खूनप्रकरणी सात जण ताब्यात

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड स्टेशनजवळील पेट्रोल पंपावर रविवारी (दि. १९) झालेल्या तरुणाच्या खून प्रकरणी पिंपरी पोलिसांनी सात जणांना रात्री उशीरा ताब्यात घेतले आहे.

आकाश सुरेश दांगडे (वय २१), तुषार बाबु मंजाळकर (वय २२), अनिल तानाजी पवार (वय २२), आकाश गणपत चव्हाण (वय २१), उमेश धर्मू राठोड (वय २१), आकाश मंगलो राठोड (वय २२) आणि महेश मलकप्पा पुजारी (वय २१, सर्व रा. इंदिरानगर वसाहत, पिंपरी) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. विनायक कैलास पाटोळे (वय १८, रा. दत्तनगर, चिंचवड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी चारच्या सुमारास विनायक हा डिझेल नेण्यासाठी मुंबई–पुणे महामार्गावर असणाऱ्या चिंचवड स्टेशन येथील पेट्रोल पंपावर दुचाकीवर आला होता. त्यावेळी पाठीमागून आणि समोरुन दुचाकीवरुन आलेल्या आरोपींनी त्याला पंपावरच घेरले. विनायकला दुचाकीवर नेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झालेल्या झटापटीत विनायक खाली पडला. त्यानंतर आरोपींनी पंपावरीलच सिमेंटचे ब्लॉक त्याच्या डोक्यात घालून निर्घृण खून केला.

विनायक हा चिंचवड येथील एका महाविद्यालयात १२ वीच्या वर्गात शिकत होता. सहा महिन्यांपूर्वी मोहननगर येथील सराईत गुंड चेतन मोहिते याचा खून झाला होता. या खुनामध्ये विनायक हा आरोपी होता.

अल्पवयीन असल्याने त्यावेळी त्याला बालसुधारगृहात ठेवण्यात आले होते. कालांतराने तो बाहेर आला होता. पूर्ववैमनस्यातून विनायकचा खून झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

‘न्यायस्वातंत्र्य समता’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे ४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२, महात्मा फुले वसाहत कोंढवा, खुर्द, कमेला, पुणे ४११०४८ येथून प्रकाशित केले.

या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वादविवाद पुणे न्यायकक्षेत, अन्यत्र कोठेही नाही.